# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

### पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### २२ जुलै २०१९ ते २३ जुलै २०१९ सकाळी ८.०० ते ८.०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २२ जुलै २०१९ पर्यंतचा एकुण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | २२ जुलै २०१८ पर्यंतचा एकुण पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ४.० | १०६७.१ | २२०३ | ४७.७७% | १५११.५ | ६७.६६% |
| सांताक्रुझ | ०.० | १४६२.० | २५१४ | ५८.१३% | १९२२.७ | ७६.४५% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २२ जुलै २०१९ पर्यंतचा एकुण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | १.७१ | ११६५.९७ | ५२.९३% | ५६.२९% |
| पूर्व उपनगरे | ०.४६ | १४९१.७३ | ५६.०१% | |
| पश्चिम उपनगरे | १.३२ | १३२४.३७ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | ३२.४ | २५.४ |
| सांताक्रुझ | ३४.३ | २७.० |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| २३.०७.२०१९ | मध्यरात्री ३:३९ | ३.४२ मी. | २३.०७.२०१९ | सकाळी ८:५८ | १.६९ मी. |
| २३.०७.२०१९ | दुपारी ३:५५ | ३.८९ मी. | २३.०७.२०१९ | रात्री १०:०५ | १.६७ मी. |
| २४.०७.२०१९ | पहाटे ४:२७ | ३.२९ मी. | २४.०७.२०१९ | सकाळी ९:४७ | १.९६ मी. |

५. हवामान अंदाज : कुलाबा वेधशाळेने पुढिल २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात अधुनमधून पावसाच्या तुरळक सरी पडण्याची शक्यता आहे.

६. **पाणी तुंबणे: निरंक**

७. **दरड कोसळणे: निरंक**

८. **घर पडल्याच्या तक्रारी**:- शहरात २, पूर्व उपनगरात १ व पश्चिम उपनगरात ३ अशा एकुण ६ ठिकाणी घराचा /भिंतीचा भाग पडल्याच्या तक्रारी नागरिकांकडून व यंत्रणांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबधित विभाग कार्यालयांना व यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. सदर तक्रारीपैकी पूर्व उपनगरात दिनांक २२.०७.२०१९ रोजी रात्री ८.२७ वा कांजी शेठ चाळ, मॅच फॅक्ट्री लेन, कुर्ला (प) येथे असलेल्या इमारतीच्या खोली क्र. १३३/२ च्या पोटमाळ्याचा काही भाग पडल्याने ५ लोक जखमी झाले. त्यांना बाहेर काढून उपचारार्थ कुर्ला भाभा रुग्णालयात पाठविण्यात आले. सर्वांची प्रकुती स्थिर असुन त्यांची नावे: **१) कुंदा बाळु खराडे, वय ४० वर्षे, २) सुरेश सुनिल खराडे, वय १८ वर्षे, ३) प्रविण अविनाश सरफरे, वय २१ वर्षे ४) तन्वी दिपक चव्हाण, वय २१ वर्षे, ५) ओंमकार रामचंद्र शिरोडकर, वय २१ वर्षे** अशी आहेत.

९. **शॉर्टसर्किट**: शहरात २, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात १ अशा एकूण ५ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या. मार नाही.

१०. **झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी** : शहरात २ व पूर्व उपनगरात १ अशा एकुण ३ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **मध्य रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **हार्बर रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **बीईएसटी** : वाहतूक सुरळीत सुरु आहे

१२. **विशेष माहिती**: १) दिनांक २२.०७.२०१९ रोजी दुपारी ०३.११ वा अग्निशमन दल नियंत्रण कक्षामार्फत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, बांद्रा पश्चिम येथील एस व्ही रोडवरील संजेरी बिल्डींगजवळ असलेल्या महानगर टेलीफोन एक्सचेंज या तळमजला अधिक नऊ असे बांधकाम असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर आग लागली. सदर आग सायं. ४.०० वा स्तर -४ ची घोषीत करण्यात आली. घटनास्थळी १६ फायर इंजिन, २ जेटी, ७ वॉटर टँकर, १ क्यूआरव्ही, ३ टी टी एल, ३ एलएल पी, ३ बीए व्हॅन, ४ अग्निशमन दलाच्या रुग्णवाहिका, १० (१०८) च्या रुग्णवाहिका, १ रोबोट गाडी, प्रमुख अग्निशमन अधिकारी, १ उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, २ डीएफओ, ४ एडीएफओ, ७एसओ असे एकूण अग्निशमन दलाचे १७५ मनुष्यबळ कार्यरत होते. परिमंडळ तीनचे उप आयुक्त श्री मसुरकर, एच पश्चिम विभागाचे, सहाय्यक आयुक्त, २ सहा अभियंता, ६ कनिष्ठ अभियंता, ४० कामगार घटनास्थळी कार्यरत होते. इमारतीच्या गच्चीवर अडकलेल्या ८५ लोकांची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. सद्यस्थितीत घटनास्थळी कुलिंग ऑपरेशन सुरु आहे.

२) दि. २२.०७.२०१९ रोजी सायंकाळी ६.४० वा. पवई तलाव, पवई गार्डन, एल ॲन्ड टी, गेट नं. १, पवई येथील तलावात एक मुलगा पडल्याच्या तक्रारीची माहिती प्राप्त झाली. सदर मुलाला बाहेर काढून राजावाडी रुग्णालयात येथे नेले असता तेथील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मुलाला मृत घोषित केले. **मृत मुलाचे नाव सत्यम गुप्ता, वय १६ वर्षे असे आहे.**

===